# शरीररचनाशास्त्र विभाग

## शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालय, सातारा

४६७, जिल्हा रुग्णालय आवार, सदर बाजार, सातारा –४१५००२

**दुरध्वनी क्रमांक :** (०२१६२) २९९८५१, २९९७६३. **Email**- anatomygmcsatara@gmail.com


---

रजिस्टर नोंदणी क्र. शा.वै.म.सा./ शरीररचनाशास्त्र विभाग / देहदान /          /२०.          दि.    /    /२०...

## **"प्रपत्र - अ"  मरणोत्तर देहदान संकल्प पत्र / इच्छापत्र**

**नवीनतम पासपोर्ट साईझ फोटो**

मी, श्री./श्रीमती. ......................................................वय..........वर्ष,

लिंग - स्त्री / पुरुष /इतर, राहणार ............................................................

.........................................................................................................

असे इच्छापत्र लिहून देतो / देते की, माझ्या मृत्यूनंतर माझा मृतदेह शरीररचनाशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा यांच्याकडे वैद्यकीय शिक्षण व संशोधना करिता हस्तांतरीत करण्यात यावा अशी माझी इच्छा आहे. मृत्यूनंतर माझ्या मृतदेहाचे संशोधन / विच्छेदन वा इतर आवश्यक असलेल्या कोणत्याही शैक्षणिक हेतूकरिता उपयोग करण्याबाबत माझी हरकत नाही.

**विशेष बाब- मी माझ्या देहदानाची इच्छा माझ्या सद्सद्विवेक बुद्धीने व संपूर्ण जाणीवपूर्वक लिहून देत आहे.**

इच्छापत्र लिहून देणाऱ्याची सही :- ...........................          दिनांक :-   /   /२०....

भ्रमणध्वनी क्र.................................................          दूरध्वनी क्र...............................

*मला / आम्हाला, श्री/श्रीमती ...................................................... यांनी, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा येथे मरणोत्तर देहदान करण्याच्या इच्छेबद्दल आम्हास कोणत्याही प्रकारची हरकत नाही. दान केलेल्या देहाचा योग्य तो उपयोग शैक्षणिक व संशोधन कारणास्तव करण्याची परवानगी मी/ आम्ही शरीररचनाशास्त्र विभागाला देत आहे/आहोत. सदर इच्छापत्र आमच्या उपस्थितीत लिहून देण्यात आले आहे.*

१) साक्षीदाराचे नाव :- ..................................................................

पत्ता :- ........................................................... सही : .............

........................................................... नाते : ..............

भ्रमणध्वनी क्र................................  दूरध्वनी क्र.....................

२) साक्षीदाराचे नाव :- ..................................................................

पत्ता :- ........................................................... सही : .............

........................................................... नाते : ..............

भ्रमणध्वनी क्र................................  दूरध्वनी क्र.....................

(कृपया मागे पहा)

GMCSATARA

## **“ प्रपत्र – ब ”**

## **देहदाना विषयीची माहिती व देहदान करावयाची प्रक्रिया**

१) देहदानाच्या महाराष्ट्र शरीररचनाशास्त्र अधिनियम (सुधारित) कलम – ५ (ब) प्रमाणे मरणोत्तर देहदान करणाऱ्या व्यक्तीने निधनापूर्वी तशी इच्छा लेखी अगर तोंडी , दोन साक्षीदारांसमोर व्यक्त केलेली असल्यास किंवा ज्या कोणा नातेवाईकाच्या ताब्यात कायदेशीरपणे मृतदेह असेल त्याने दात्याच्या / आपल्या इच्छेप्रमाणे मृतदेह मान्यताप्राप्त वैद्यकीय संस्थेस दान करण्याचे ठरवून (कायदेशीर पुरावा करुन) देहदान केल्यास त्याचा स्विकार केला जातो. तथापि, आपण आपली इच्छा व्यक्त करणारे इच्छापत्र करुन ते वैद्यकीय महाविद्यालयाकडे पाठविल्यास अधिक सोईचे होईल.

२) भारतीय नागरीक असलेली कोणीही सज्ञान व्यक्ती (१८ वर्षा वरील) देहदानाचा संकल्प करुन इच्छापत्र करु शकते. देहदान रुढीविरोधी आहे पण अधार्मिक नाही. आपल्या श्रद्धेनूसार देहदान करुन ही धार्मिक विधी करता येतात.

३) देहदान करु इच्छिणाऱ्या व्यक्तीने मरणोत्तर देहदान इच्छापत्र (प्रपत्र – अ) फोटो सहीत, दोन प्रतीमध्ये भरावे व नोंदणीपश्चात त्यातील एक प्रत स्वतःकडे (तसेच जवळच्या नातेवाईकाकडे) ठेवून दुसरी प्रत शरीररचनाशास्त्र विभागात जमा करावी (प्रत्यक्ष येवून जमा करणे शक्य नसल्यास पोस्टाने पाठवली तरी चालेल). सदर इच्छापत्र हे नातेवाईकांवर नैतिकरित्या बंधनकारक ठरते.

४) मृत्यू नंतर जवळच्या नातेवाईकांनी कार्यालयीन वेळेत दुरध्वनीद्वारे तात्काळ शरीररचनाशास्त्र विभागात संपर्क साधावा, तसेच कार्यालयीन वेळे व्यतिरिक्त वैद्यकीय अधिक्षक / अपघात विभागातील वैद्यकीय अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. मृत्यूपश्चात मृतदेह सहा (६) तासाच्या आत स्वखर्चाने शरीररचनाशास्त्र विभागात पोहचवण्यात यावा. सहा तासानंतर मृतदेह खराब होण्यास सुरवात होते व असा मृतदेह स्वीकारण्यात येत नाही. मृतदेह दिवसा / रात्री केव्हांही स्विकारला जाईल. मृतदेह कार्यालयीन वेळेत ( सकाळी १० ते संध्याकाळी ०५ वाजेपर्यंत) शरीररचनाशास्त्र विभागात स्विकारले जाईल. कार्यालयीन वेळे व्यतिरिक्त व सुट्टीच्या दिवशी न्यायवैद्यकशास्त्र विभागाच्या शवागारात स्विकारण्यात येईल.

५) जर नेत्रदान करावयाचे असल्यास आधी नेत्रदान उरकुन घ्यावे. नेत्रदानाबाबत अधिक माहितीसाठी नेत्ररोग विभागाशी संपर्क साधावा.

६) अपवादात्मक परिस्थिती (सख्या नात्यातील व्यक्ती परेदशातुन पुढील २४ तासापर्यंत येणार असल्यास) वगळता, एकदा मृतदेह दान केल्यानंतर कोणाही व्यक्तीस अंत्यदर्शन घेता येणार नाही. तसेच मृतदेहबाबत विचारपूसही करता येणार नाही.

७) देहदान करावयाचा मृतदेह घेऊन येणाऱ्या कायदेशीर वारसाने / नातेवाईकाने मृतदेह स्वीकारण्याबाबत मा. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा / प्राध्यापक व विभाग प्रमुख, शरीररचनाशास्त्र विभाग, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा यांचे नावे देहदान स्वीकारण्याबाबत अर्ज करावा / संमती पत्र भरावे.

८) विनंती अर्ज / संमतीपत्रा सोबत खालील **कागदपत्रे** आवश्यक आहेत, त्या शिवाय मृतदेह स्वीकारला जाणार नाही.

  १) डॉक्टरांनी दिलेल्या **मृत्यूच्या दाखल्याची प्रत** (Medical Certificate of Cause of Death ). जर मृत्यूसमयी सदर व्यक्तीस एच आय व्ही (एड्स), टी.बी., स्वाईन फलू, हिपॅटायटीस – बी, टिटॅनस, रेबीज, कोव्हिड – १९ यासारखे संसर्गजन्य रोग असतील तर मृतदेह स्वीकारला जाणार नाही.

  २) देहदानाबाबत **इच्छापत्र** केलेले असल्यास त्याची प्रत अथवा जवळच्या नातेवाईकाचे **संमतीपत्र.**

*मी/ आम्ही ———————————————————— सदर इच्छापत्र भरुन देणारा / इच्छापत्रास साक्षीदार या नात्याने मला / आम्हाला उपरोक्त देहदान करावयाच्या सर्व अटी मंजूर आहेत म्हणून संमतीने स्वाक्षरी करीत आहे / आहोत.*

**१) साक्षीदाराचे नावः– ———————————— नाते :———— स्वाक्षरी :–**
**२) साक्षीदाराचे नावः– ———————————— नाते :———— स्वाक्षरी :–**
**३) इच्छापत्र लिहून देणाऱ्याची सही :–**

**स्थळ : –** **दिनांक :– / /२०**

**टिप :–** *या अर्जासोबत देहदान ईच्छा व्यक्त करणाऱ्या व्यक्तीचे तसेच किमान २ जवळच्या नातेवाईकाचे / साक्षीदाराचे आधार कार्डची छायाकिंत प्रत जोडणे आवश्यक आहे*

GMCSATARA